Maharashtra State Board
of
Secondary & Higher
Secondary Education
Kolhapur Divisional Board
Kolhapur-416004

महाराष्ट्र राज्य माध्यमिक व
उच्च माध्यमिक शिक्षण मंडळ,
कोल्हापूर विभागीय मंडळ,
कोल्हापूर–४१६००४

Ph No. 0231-2696101/2/3 WebSite : www.sscboardkolhapur.in Email: divsec.kop@gmail.com

क्र. कोविम / डिपी / ३४८७
दिनांक - 06 OCT 2025

प्रति,

प्राचार्य/ मुख्याध्यापक,
माध्यमिक शाळा व उच्च माध्यमिक कनिष्ठ महाविद्यालये,
सातारा, सांगली, कोल्हापूर.

विषय: शाळा व कनिष्ठ महाविद्यालयांच्या मार्गदर्शनार्थ तयार करण्यात आलेल्या बोर्ड परीक्षेचा राजमार्ग, सूत्रबद्ध नियोजनातून यशाकडे या पुस्तिकेच्या परिणामकारक अंमलबजावणीबाबत..

संदर्भ: १) मुख्याध्यापक/प्राचार्य सहविचार सभा दिनांक २४.०९.२०२५, २५.०९.२०२५ व २६.०९.२०२५

२) मुख्याध्यापक, शिक्षक, शिक्षकेतर संघटना सहविचार सभा दिनांक ०९.०९.२०२५

उपरोक्त विषयी सूचित करण्यात येते की, महाराष्ट्र राज्य माध्यमिक व उच्च माध्यमिक शिक्षण मंडळ पुणे अंतर्गत कोल्हापूर विभागीय मंडळ सन १९९२ पासून कार्यरत आहे. तेव्हापासून या विभागीय मंडळाचा निकाल उच्चत्तम आहे.

दहावी बारावी मंडळ परीक्षेच्या अनुषंगाने प्रशासकीय व शैक्षणिक कामकाज वर्षभर शाळा व कनिष्ठ महाविद्यालयांचे कामकाज सुरू असते. या कामकाजात सुसूत्रता व शिस्तबद्धता यावी, नियोजनामुळे सुलभता यावी आणि पर्यायाने विभागीय मंडळाचे कामकाज अधिक परिणामकारक व्हावे, या उदात्त हेतूने सदरची छोटेखानी पुस्तिका मंडळातील कार्यरत अधिकारी व कर्मचारी, सेवानिवृत्त अधिकारी कर्मचारी, विभागीय मंडळ अंतर्गत जिल्ह्यातील अनुभवी प्राचार्य, मुख्याध्यापक आणि विविध संघटनांचे पदाधिकारी यांच्याशी चर्चा करून तयार करण्यात आली आहे.

संदर्भ क्र.०१ मधील जिल्हानिहाय बैठकांमध्ये व संदर्भ क्र.०२ मधील बैठकीमध्ये याविषयी सविस्तर चर्चा करण्यात आली आहे. पुस्तिका तयार करण्यासाठी विभागातील अनेकांची मदत झाली आहे. सदरची पीडीएफ प्रत सोबत जोडली आहे.

या पुस्तिकेत महिनानिहाय प्रशासकीय व शैक्षणिक कामकाज देण्यात आलेले असून हे दोन्ही कामकाज प्रभावी होण्यासाठी विशेष उपक्रम सुचविण्यात आले आहेत. प्रशासकीय कामकाज अनिवार्य असून शैक्षणिक कामकाजांबाबत शाळा व कनिष्ठ महाविद्यालयांना, त्यांच्याकडे उपलब्ध असणारे मनुष्यबळ, सोयी व साधने, वेळ याचा विचार करता काही अंशी स्वातंत्र्य दिलेले आहे. मागील वर्षी राज्यमंडळाने दिलेल्या उपक्रमात भर घालून आणखी काही परीक्षापूरक विशेष उपक्रम सुचविले आहेत. विशेष उपक्रमांच्या मदतीने दोन्ही प्रकारचे कामकाज सुलभ व आनंददायी होण्यास नक्कीच मदत होईल.

चालू शैक्षणिक वर्षातील प्रथम सत्रात देण्यात आलेले प्रशासकीय व शैक्षणिक कामकाज तसेच विशेष उपक्रम दिवाळीपूर्वी पूर्ण करण्याचा प्रयत्न करावा. **व्दितीय** सत्रात काटेकोरपणे नियोजनाप्रमाणे अंमलबजावणी करावी. दरमहा विभागीय मंडळाकडून याबाबत पाठपुरावा बैठका घेण्यात येतील. पुस्तिकेत ठळक कामे देण्यात आलेली असून राज्य मंडळ व विभागीय मंडळाच्या वेळोवेळी निर्गमित होणाऱ्या परिपत्रकानुसार कामकाज करणे आवश्यक आहे. चालू वर्षाच्या अंमलबजावणीनंतर अनुभवाच्या आधारे पुढील वर्षासाठी पुस्तिका अधिक समृद्ध करता येईल.

सदरची नियोजन पुस्तिका शाळा व कनिष्ठ महाविद्यालयांना कार्यालयीन वापरासाठी दिलेली आहे, विक्रीसाठी नाही याची नोंद घ्यावी.

Digitally signed by
Subhash Rajaram Chougule
Date: 06-10-2025 17:20:27

(सुभाष रा.चौगुले)
विभागीय सचिव,
कोल्हापूर विभागीय मंडळ, कोल्हापूर

प्रत माहितीसाठी -

१. मा. जिल्हाधिकारी, सातारा सांगली व कोल्हापूर
२. मा.सचिव, राज्य मंडळ पुणे
३. सर्व शिक्षणाधिकारी(माध्यमिक), सातारा, सांगली, कोल्हापूर.